आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२० जून २०२५ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- मध्यस्थांना दूर करून नाफेड लवकरच शेतकऱ्यांकडून थेट शेतमाल खरेदी करण्याची केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांची घोषणा

- अन्नसुरक्षा, पोषणयुक्त आहार आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्याचं केंद्र सरकारचं उद्दिष्ट असल्याचं केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांचं प्रतिपादन

- शेअर बाजारात मोठी तेजी, सेन्सेक्स ८२ हजार आणि निफ्टी २५ हजारांच्या पलीकडे

**आणि**

- आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त उद्या सर्वत्र विविध कार्यक्रमांचं आयोजन

**<><><><><>**

कृषी उत्पादनाच्या खरेदी प्रक्रियेतले मध्यस्थ दूर करून नाफेड लवकरच शेतकऱ्यांकडून खरेदी करायला सुरुवात करणार असल्याची घोषणा केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी आज केली. आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या निमित्ताने आयोजित राष्ट्रीय परिसंवादात ते आज मुंबईत बोलत होते. यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाची योग्य किंमत मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ते म्हणाले,

**होल्ड... बाईट- अमित शहा (१९ सेकंद)**

सहकार सूत्रावर आधारित विमा कंपनीही सरकार लवकरच सुरू करणार असल्याचं शहा यांनी सांगितलं. देशभरात दोन लाख नव्या प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था स्थापन करणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. येत्या १० वर्षांत निर्यात, सेंद्रीय अन्न आणि बियाणं या तीन क्षेत्रांमधल्या मोठ्या सहकार संस्था देशात उभ्या

राहतील आणि शेतकऱ्यांचं जीवनमान उंचावण्यासाठी अमूल्य योगदान देतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी बोलताना महाराष्ट्राला लाभलेला १२० वर्षांचा सहकार चळवळीचा इतिहास अधोरेखित केला.

देशाची अन्नसुरक्षा अबाधित राखणं, शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढवणं, देशवासीयांना पोषणयुक्त आहार देणं आणि पृथ्वीचं हित जपणं ही सरकारसमोरची प्रमुख उद्दिष्टं असल्याचं प्रतिपादन केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी या परिषदेत केलं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात राबवलेल्या विविध योजनांच्या केंद्रस्थानी अल्पभूधारक शेतकरी असल्याची बाब त्यांनी अधोरेखित केली. प्रयोगशाळांमध्ये संशोधन करणारे कृषी वैज्ञानिक आणि शेतात काम करणारे शेतकरी यांच्यातलं अंतर कमी करण्यासाठी सरकारनं विशेष योजना राबवल्याचा उल्लेखही केंद्रीय कृषिमंत्र्यांनी केला.

नाफेडच्या पाच उत्पादनांचं लोकार्पण, तसंच पाच शेतकरी उत्पादक कंपन्यांना अनुदान किंवा समभागांचं वाटपही मान्यवराच्या हस्ते यावेळी झालं.

**<><><><><>**

भविष्यातल्या गरजा लक्षात घेऊन सरकारकडे धोरण, कायदे आणि पायाभूत सुविधांची मागणी करणाऱ्या, आपल्या अडचणी सरकारसमोर मांडणाऱ्या संस्था गरजेच्या असल्याचं मत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी व्यक्त केलं. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चरचं नूतनीकृत मुख्यालय आणि सहकारी औद्योगिक वसाहत राज्यस्तरीय परिषदेच्या उद्घाटनानंतर ते बोलत होते.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चरच्या गेल्या १०० वर्षांच्या वाटचालीदरम्यान आजूबाजूची सगळी परिस्थिती अमूलाग्र बदलली असून त्या बदलांशी जुळवून घेण्याच्या आणि कालसुसंगत राहण्याच्या दृष्टीनं अशा संस्थांनी आत्मपरिक्षण करायची गरज आहे, असं ते म्हणाले.

राज्य सरकार आणि चेंबरने एकत्रितपणे आणि सहकार्याने काम करावं आणि राज्याला पुढे न्यावं, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. उद्योग आणि व्यापाराला गुंतवणूक करण्यासाठी अतिशय पोषक वातावरण राज्यात असल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी दिली.

**<><><><><>**

'धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान' अंतर्गत आदिवासी गावांमध्ये १७ योजनांची अंमलबजावणी करणार असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. जळगाव जिल्ह्यात धरणगावात उभारण्यात आलेल्या क्रांतिकारी खाज्याजी नाईक स्मारकाचं उद्घाटन आणि जामनेर तालुक्यात गोद्री फत्तेपूर इथं गोर बंजारा आणि लबाना कुंभ स्मृतीस्थळी पाच कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचं ई-भूमिपूजन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आज झालं. त्यावेळी ते बोलत होते.

धरणगाव इथल्या ग्रामीण रुग्णालयाचं उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन करून ५० खाटांचं अत्याधुनिक उपजिल्हा रुग्णालय उभारण्याच्या कामाचा प्रारंभ फडणवीस यांच्या हस्ते आज झाला.

**<><><><><>**

हिंदी भाषेची सक्ती असू नये. पण, हिंदी भाषेचा द्वेष करणं हे विद्यार्थ्यांच्या हिताचं नाही, असं मत खासदार शरद पवार यांनी आज बारामतीमध्ये पत्रकारांशी बोलताना व्यक्त केलं.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये आपली एकत्र निवडणूक लढवण्याची इच्छा आहे, तरीही महाविकास आघाडीतल्या घटक पक्षांशी चर्चा करून निर्णय घेऊ, असं पवार यावेळी म्हणाले. महाविकास आघाडीमध्ये अद्याप मुंबई महापालिका निवडणुकीबाबत कुठलीही ठोस चर्चा झालेली नाही. मात्र,

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचं मुंबईतलं बळकट स्थान पाहता एकत्र लढायचं किंवा नाही, तेही चर्चा करून ठरवू, असंही पवार यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

इस्राइल - इराण संघर्षामुळं सलग तीन दिवस घसरलेल्या देशातल्या शेअर बाजारात आठवड्याच्या शेवटच्या सत्रात मोठी तेजी झाली. त्यामुळं सेन्सेक्स पुन्हा ८२ हजार आणि निफ्टी २५ हजाराच्या पलीकडे जाऊन बंद झाला.

इराणसोबत चर्चेची दारं अजून खुली असून इस्राइलला पाठिंबा देण्यावर २ आठवड्यात निर्णय घेऊ असं अमेरिकन म्हटल्याचा सकारात्मक परिणाम शेअर बाजारांवर झाला. सेन्सेक्स दिवसअखेर १ हजार ०४६ अंकांनी वधारुन ८२ हजार ४०८ अंकांवर बंद झाला तर निफ्टी ३२० अंकांनी वधारुन २५ हजार ११२ अंकांवर स्थिरावला. बांधकाम, वित्तीय सेवा, वाहन, आरोग्य क्षेत्रातल्या कंपन्यांचे समभाग मोठ्या प्रमाणात वधारले.

**<><><><><>**

अकरावा आंतरराष्ट्रीय योग दिन उद्या २१ जूनला साजरा होणार आहे. आयुष मंत्रालयानं विशाखापट्टणम इथं आयोजित केलेल्या मुख्य समारंभात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, योग प्रात्यक्षिकांमधे भाग घेणार आहेत. आंध्र प्रदेशातले २ कोटींहून अधिक जण या सोहळ्यात सहभागी होतील, असं आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू म्हणाले. सांस्कृतिक मंत्रालयाच्या वतीनं देशभरातल्या १०० पर्यटन स्थळांवर योग दिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. उद्याच्या विशाल योगसंगम कार्यक्रमासाठी देश- विदेशातून नोंदणी करणाऱ्या योग अभ्यासकांची संख्या १० लाखांच्या पुढे गेली आहे.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त राज्यभरातही विविध ठिकाणी योग प्रात्यक्षिकं होणार आहेत. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून.

**होल्ड कॅप्सूल**

*केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी योग ही एक जीवनशैली आहे असं सांगत योगाभ्यासाचा दैनंदिन जीवनात समावेश करण्याचं आवाहन केलं आहे....*

***होल्ड बाईट***

*संत ज्ञानेश्वर महाराज आणि श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालख्या उद्या पुण्यात मुक्कामी आहेत. यानिमित्ताने राज्य सरकारच्या पुढाकाराने भव्य वारकरी भक्तीयोग उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या या उपक्रमात वारकरी, विद्यार्थी, योग अभ्यासक असे साधारण दहा लाख साधक योगसाधना करणार आहेत.*
*रायगड जिल्ह्यात उरण इथे सकाळी साडे पाच वाजता जवाहरलाल नेहरू पोर्ट अथॉरिटीच्या टाऊनशिपमध्ये योग संगम कार्यक्रम होणार आहे. सांगलीमध्येही उद्या सकाळी भक्तियोग, हा अनोखा उपक्रम साजरा होणार आहे. यामध्ये संपूर्ण सांगली जिल्ह्यात एकाच वेळेस एकाच तालावरती योगासनं करण्यात येणार आहेत. नाशिक जिल्ह्यातही योगदिनानिमित्त महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठानं भव्य योग जनजागृती सत्राचं आयोजन केलं आहे. छत्रपती संभाजीनगर इथं योग दिनाचा जिल्हास्तरीय कार्यक्रम उद्या सकाळी बिबी का मकबरा परिसरात होणार आहे. लातूर, जळगाव, नांदेड, धाराशिव, बीड, धुळे, वर्धा या जिल्ह्यांमध्येही योग दिनाचे कार्यक्रम होणार आहेत. सकाळच्या सत्रात होणाऱ्या या कार्यक्रमांमध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येनं सहभागी होण्याचं आवाहन प्रशासनानं केलं आहे. योग दिनाच्या निमित्ताने उद्या मुंबईत टिळक नगर इथल्या अंध जनमंडळ या संस्थेतर्फे १०० अंधांना दृष्टिहीनांसाठी तयार करण्यात आलेल्या विशेष रेनकोटचं वाटप करण्यात येणार आहे.*
*मुंबईत मंत्रालयाच्या प्रांगणात आज योग प्रात्यक्षिकांचं आयोजन करण्यात आलं होतं. केंद्रीय संचार ब्युरो आणि वर्धा जिल्हा प्रशासनाच्या वतीने महादेवपुरा इथे आज छायाचित्र प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं होतं. )*

**<><><><><>**

संत ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालखी दुपारी पुणे शहरात दाखल झाल्या. दोन्ही पालख्यांच्या स्वागतासाठी दुपारपासून

पुणेकरांनी गर्दी केली होती. तुकोबांच्या पालखीचा मुक्काम नाना पेठेतील निवडुंगा विठ्ठल मंदिरात आणि माऊलींच्या पालखीचा मुक्काम  भवानी पेठेतील पालखी विठोबा मंदिरात असेल.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात कोकणात बहुतांश ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे. या काळात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**